**<u>प्रेसनोट</u>** **दिनांक २६/१२/२०२४**

**बृहन्मुंबईसह महाराष्ट्र राज्यातील वयोवृध महिला व पुरुषांना लक्ष्य करुन मालकाला मुलगा झाला असल्याची बतावणी करून फसवणुक करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीस जेरबंद केलेबाबत.**

दिनांक २७/११/२०२४ रोजी ११.४५ ते १२.३५.वा. चे दरम्यान फिर्यादी श्रीमती सलमा गूलामनबी कुरेशी, वय ७३ वर्षे या मच्छीमार्केट, खार दांडा येथे गेलेल्या असताना, त्यांच्या जवळ एक अनोळखी इसम आला व '' ऑण्टी हमारा एक सेठ है। उसे बहुत दिनो के बात लडका हुआ है। वो इस खुशी मे सिनिअर सिटीझन को पैसा बाट रहा है। तो तुम मेर साथ चलो.'' असे बोलून त्याने फिर्यादी यांना एका गल्ली मध्ये घेवून गेला. सदरवेळी गल्लीत एक दुसरा इसम बसला होता. तो फिर्यादी यांना बोलला की ''आप आपका पहना हुआ सोना निकालकर आपके पर्स मे रख दो, आपका सोना देखकर हमारा सेठ आपको पैसे नही देगा'' यावर फिर्यादी यांनी त्यांच्या गळयातली दोन तोळे वजनाची सोन्याची चैन व एक तोळा वजनाचे कानातील कर्णफुले व अर्धा तोळा वजनाच्या सोन्याच्या कानातील साखळया काढुन त्यांच्या पर्स मध्ये ठेवल्या व सदर पर्स त्यांनी पदरात बांधत असताना, सदर इसमाने हात चालाखी करुन सर्व दागीने लबाडीच्या इरादयाने काढून घेतले व त्याचे शेठकडुन पैसे देतो असे सांगून सदर ठिकाणाहून पलायन केले आहे, अशी तक्रार दिलेने खार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र ११६२/२४ कलम ३१८(४),३(५) भा.न्या.स अन्वये नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या आजपावेतो केलेल्या तपासावरून सदरचा गुन्हा हा आरोपी १) बालाजी रोहिदास पवार वय २० वर्षे, रा.ठि. माहिम रेतीबंदर ब्रीजखाली, माहिम पश्चिम, मुंबई, २) अर्जून बापुनाथ काळे वय २४ वर्षे,रा.ठि. चिक्कूवाडी झोपडपटटी नाल्याजवळ, बोरीवली पूर्व, मुंबई यांनी केला असल्याचे निष्पन झालेने त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली असून सदर गुन्हयातील फसवणूक झालेली रू.१,३१,२५०/- किमंतीचे सोन्याचे दागिणे हस्तगत करण्यात आले आहते. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान नमूद आरोपीतानी खार पोलीस ठाणे येथील इतर १) गु.र.क्र ८१०/२४ कलम ३१८(४) भा.न्या.सं, २) गु.र.क्र. २१३/२४ कलम ४२०,३४ भा.द. वि, ३) गु.र.क्र. ८९४/२४ कलम २०४,३१८(४),३(५) भा.न्या.सं केले असल्याचे निष्पन्न झाले असून सदर गुन्हयातील फसवणूक केलेले रू. ३,२२,७१८/- किमंतीचे सोन्याचे दागिणे देखील हस्तगत करण्यात आले आहे. अशाप्रकारे खार पोलीस ठाणे येथील एकूण चार गुन्हे

उघडकीस आणून एकूण ४,५३,९६८/- रूपये किंमतीची संपुर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयांचा पुढील तपास चालू आहे.

सदर आरोपीतांनी बृहन्मुबई हददीतील विविध पोलीस ठाणे येथे २० पेक्षा अधिक गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त श्री. सत्यनारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री. परमजीतसिंह दहिया, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ९ श्री. दिक्षीत गेडाम, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, बांद्रा विभाग श्री. अधिकराव पोळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खार पोलीस ठाणे श्री. संजीव धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. वैभव काटकर, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि श्री. दत्ता कोकणे, स.पो.उ.नि श्री. मनोज वैद्य, गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार पो.ह. श्री. निकम, पो.शि.श्री. सानप, पो.शि. श्री. जाधव, पो.शि. श्री. लहामगे, पो.शि. श्री. गळवे, पो.शि. श्री. कदम यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

--------oo-------